स्वामी रामानंद तीर्थमराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

मानव्यविद्या शाखेतील मराठी विषयाच्या विद्यावाचस्पती पदवीसाठी

करावयाच्या शोधप्रबंधाचा प्राथमिक आराखडा

संशोधन आराखडा

“स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबरीतून आविष्कृत झालेल्या शेतकरी चळवळीचे चित्रण : एक चिकित्सक अभ्यास”

संशोधक

राहुल कुंडलिकराव पडोळे

मार्गदर्शक

प्रा.डॉ.मा.मा.जाधव

प्राचार्य, भाषा विभाग प्रमुख,

हु. बहीर्जी स्मारक महाविद्यालय वसमत

संशोधन केंद्र

हु. बहीर्जी स्मारक महाविद्यालय, व स म त

१. प्रस्तावना:

स्वातंत्र्योत्तर आणि स्वातंत्र्यपूर्व कालखंडालीनराजकीय आणि सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीमुळे आत्मभान आलेल्या नवप्रतिभावंतानी ग्रामीण आणि दलित साहित्याच्या प्रवाहामध्ये आपल्या दुर्लक्षित आणि अनोख्या जीवन जाणीवांना मुखर केले आहे. कथा, कविता, कादंबरी या सर्वच नव वाङ्मयीन प्रवाहांनी मराठी साहित्याचे दालन समृद्ध केलेले आहे. अश्या समृद्ध परंपरेतील ग्रामीण साहित्याचा एक प्रवाह आत्यंत दर्जेदार व सकस जाणीवांचा प्रदेश म्हणून नावारूपाला आलेला आहे. कथा, कांदबरी ,नाटक, चरित्र, आत्मचरित्र अशा विविध वाङ्मय प्रकारातून ग्रामीण जीवनातील लेखकांनी प्रतिभावंतानी आपले अनुभव विश्व उजागर करणाचा प्रयत्न केला आहे. एकुणच मराठी कादंबरीचा इतिहास बघीतला तर असे लक्षात येईल की, म.फुलेंच्या वैचारिक लढ्यातून साकार झालेले लेखकांनी 'बळीबा पाटील' कृष्णाराव भालेकरांची कादंबरी तसेच 'पिराजी पाटील' धनुधारी यांची कादंबरी शेतकरी जीवनावर भाष्य करतांना दिसते. विविध सामाजिक सुधारणा करु इच्छिणाऱ्या अनेक समाजसुधारकांनी आपापल्या दृष्टिकोनातून वाटणाऱ्या सुधारणा करण्याचा आपल्या कृतीतून आणि साहित्यामधून ही सातत्याने प्रयत्न केला आहे.एकोणिसाव्या शतकामध्ये शेतकरी आणि एका ग्रामीण कष्टकरी समाजाच्या शोषणा विरुद्ध कार्य करणारे जे थोडेच समाजसुधारक व विचारवंत होऊन गेले, त्यापैकी कृष्णाराव भालेकर हे होते. जो शेतकरी-कष्टकरी वर्ग फसला जात आहे, ज्या चे शोषण होत आहे. त्यासाठी आपण काही करायला पाहिजे अशी समाज सुधारणा विषयक क्रांतिकारी विचारांची बीजे भालेकरांच्या मनात त्या वेळी अंकुरली समाजातील अज्ञानी लोकांचे-शेतक-यांचे अज्ञान दूर करणे, दारिद्र्य नष्ट करणे आणि दुःख नाहीसे करणे यासाठी त्यांनी आपल्या लेखनीतून 'बळीबा पाटील' नावाची कादंबरी लिहून तत्कालीन शेतकरी प्रश्नावर भाष्य केले. ते आजच्या घडीलाही तंतोतंत लागू होत आहे.

पहिल्या पंचवार्षिक योजने पासून ते आजतगयात ही शेतकयांची दयनीय अवस्था जसी च्या तसी आहे पण त्या मानाने वर्गीयांच्या जीवनाचा दर उंचावत चालला आहे. ज्या वर्गाचा दर्जा उंचावला आहे ते आज शेतकऱ्यांना पाण्यात बघतात. हिन वागणूक देतात. यांची खत एक संशोधक म्हणून मला वाटते. १९९० च्यापूर्वीचा कालखंड म्हणजे आधुनिक वाङ्मयाच्या निर्मितीचा प्रारंभाचाच कालखंड होता. शिक्षणाचा प्रसार उच्च किंवा मध्यम वर्गीयांच्या पलीकडे गेला नव्हता त्यातून लेखन करणारी मंडळी ही बहुवंशाने पांढरपेशा, वर्गातील व मोजक्या अशा शहरातून नोकरी, व्यवसायाच्या निमित्ताने राहणारी होती. आपण राहतो त्या पांढरपेशा नगर जीवनापलीकडे ही एक विशाल, विस्तीर्ण असे ग्रामीण जीवन आहे आणि या जीवनातील सुख दुःख, समस्या हेही लेखन विषय होऊ शकतात. याची फारच थोड्यांना जाणीव होती. शिवाय त्यांच्या अनुभवांनाही नागर जीवनाच्या मर्यादा होत्या. म्हणून सत्तर-ऐंशी टक्के खेडी असलेल्या या देशातील आणि महाराष्ट्रातील सामजीवनाचे चित्रण साहित्यात अभावानेच केले जात होते. त्यातूनही हरिभाऊ आपटे, ना.सी.फडके इ.उच्च व मध्यमवर्गीय जीवनाचे चित्रण करणाऱ्या लेखकांचा तत्कालीन प्रभाव होता. कदाचित या कारणामुळे ही असलेले वास्तवदशी ग्रामीण जीवनाचे चित्रण म्हणावे तसे होऊ शकले नाही. ही बाब नाकारून चालणार नाही कदाचित म्हणूनच पिराजी पाटील च्या नंतर पुढे जवळपास पंचवीस-तीस वर्ष ग्रामीण जीवनाचे चित्रण करणारी कादंबरी मराठी मध्ये येऊ शकली नाही. हे कटुसत्य स्वीकारल्या शिवाय पर्याय नाही.१९२० च्या नंतरचा काळ हा अनेक अर्थाने महत्त्वाचा आहे महाराष्ट्रामध्ये राजकीय आणि सामाजिक स्वरुपाची उलथापालथ सुरू झाली होती. परिवर्तनाच्या दिशा उजाळू लागल्या होत्या.म.गांधीच्या रुपाने राजकीय क्षेत्रात एका नव्या नेतृत्वाचा उदय झाला होता. ‘खरा भारत खेड्यातच आहे म्हणूनच खेड्यांचा उधार झाला पाहिजे यासाठी खेड्याकडे चला’ या घोषणांचा परिणाम तत्कालीन राजकीय सामाजिक कार्यकर्त्यावर झाला पण एकूणच बुद्धीवाद्यांवर अनुषंगानेच साहित्य निर्मितिकारांवर झाला. तसेच आंदोलनाचा होणारा लोक मानसाचा परिणाम. इथेली समाजमानसा जे भान मिळाले त्यांच्या बरोबर शिक्षणाचे सार्वत्रिकरणामुळे या देशातील असलेल्या खेड्यापाड्यातील वाड्यातांड्यातील असलेल्या अपेक्षित घटकांना आत्मभान आले या आत्मभानातून नव्या जीवन जाणिवांना मुखर करण्याचा प्रयत्न नवशिक्षितांनी तरुणांनी अर्थात ग्रामीण भागातून आलेल्या नवलेखकांनी आपले जगणे,भोगणे लेखणीतून मांडून प्रत्यक्ष असलेल्या चळवळीचा प्रभाव शेतकरी आंदोलनाचा, शेतकरी चळवळीचा फार मोठा परिणाम या देशातील कृषी परंपरेत राबवून सुशिक्षित लेखकांनास्वातंत्र्याची पाहाट उजाडली आणि प्रजासत्ताक भारत अस्तीत्वात आला यामुळे

शिक्षणाचे सार्वत्रिकरण फार मोठ्या प्रमाणात झाले महात्मा फुले म्हणाले की ‘शिक्षण हा माणसाचा तिसरा डोळा आहे.’ ज्ञान चक्षूमुळे मनुष्याला त्याच्यावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्याचे आत्मबळ महात्मा फुलेंच्या ग्रंथाच्या माध्यमातून झाले. यामध्ये 'गुलामगिरी','शेतकऱ्याचा आसूड' मधून शेतकऱ्यांच्या दुःख स्थितीचे वर्णनाचे केंद्र शोषणाची बीजे आहेत. ती उघडून फेकल्या शिवाय शेतकऱ्याला त्याच्या आयुष्यात चांगले दिवस येणार नाहीत. एका अर्थाने शोषणमुक्तीचाच मार्ग शेतकऱ्यांना महात्मा फुले च्या विचारधरेतूनच मिळालेला होता. ग्रामीण भागातून सुशिक्षित शिक्षण घेऊन जी पुढे आलेली नवलेखक कवी मंडळी होती त्या लेखकानी आपलेही एक साहित्य असू शकते आपल्या जीवनाचे प्रतिबिंब मराठी साहित्यात असले पाहिजे. या भूमिकेतून दुर्लक्षित असलेल्या जीवन जाणिवांना शब्दरूप देण्याचा प्रयत्न आपल्या साहित्यातून केला.

१९३०-३५ च्या दरम्यान खेड्यातील असलेल्या समाज स्थितीवर या लेखानावर आधारित आहे. ही जशी ग्रामीण कादंबरी आहे, त्याचप्रमाणे ध्येय प्रधान व बोध प्रधानी आहे. शेतकऱ्यांचे अज्ञान व सावकारांची लोभी वृत्ती यावर आधारलेली ही कादंबरी नायक प्रधान आहे. मानवी स्वभावाच्या अनेक सूक्ष्मछटा रेखाटण्याचा खेड्याच्या प्रयत्न यात दिसतो. थोडेसे पुढे म्हणजे (१९३७)मध्ये अन्नदाता उपाशी ही वि.वा.हडप यांची कादंबरी प्रसिद्ध झाली.नंतर आई आहे शेतात आणि पड रे पाण्या १९४० लगेच चार वर्षानंतर समरांगण (१९४१) ही म.भा.भोसले यांची कादंबरी ती शेतकरी जमीनदार यांच्यामधील संघर्षावर आधारित आहे यानंतरचा काळ म्हणजे (१९४५) नंतरचा काळ या दृष्टीने महत्त्वाचा म्हटला पाहिजे हा काळ एकूण वाङ्मयातील परिवर्तनाचा काळ आहे.या काळातील लेखकांचा जीवनाचे भेदक व वस्तुनिष्ठ चित्रण करण्याकडे असलेला दिसून येतो या काळातील लेखक घटना प्रसंगापेक्षा मानवी मनाला प्राधान्य देऊ त्यांची आंदोलने टिपण्यावर भर देऊ लागले. प्रादेशिक ग्रामीण कादंबरीने माणसाला प्रदेशापासून वेगळे करता येत नाही तोही येथील वातावरणाचा पाईक असतो १९४५ ते १९५० च्या मराठी ग्रामीण कादंबरी मधून विशिष्ट ग्रामीण परिस्थितीतील परिसरातील वास्तवाला कलात्मक पातळीवर साकारण्याचा प्रयत्न दिसतो तसेच १९४० ते १९६० मध्ये वास्तवादी जाणिवा प्रभावी झालेल्या दिसतात 1960 ते 1980 च्या दशकात काही दर्जेदार साहित्यकृती ची निर्मिती झालेली यामध्ये इंधन,गांधारी, पाचोळा आणि विशेषत: गोतावळा या कादंबरीने गाठलेली उंची साक्ष देणारी आहे.

१९६० ते १९८० मधील ग्रामीण कादंबरीने प्रकट केलेले आहे नव्या मध्ये मातब्बर प्रतिभावंत लेखक नाहीत. किंवा मागील श्रेष्ठ ग्रामीण कादंबरीशी तुलना करावी अशा तोला मोलाची साहित्यकृती नाही. पण मराठी ग्रामीण कादंबरी वाङ्मयाच्या दृष्टीने १९८० ते १९९० हा कालखंड अतिशय वैशिष्ट्यपूर्ण असा आहे १९९० ते २०२० च्या चळवळीला वाहिलेल्या सकस कादंबऱ्यांच्या माध्यमातून नवी दृष्टी देण्याचा प्रयत्न कादंबरी करांनी केलेला ज्या पिढ्यानपिढ्यांचे दुःख इतिहासाला तिजांजरी देऊन शेतकरी चळवळ आपल्या साहित्यातून उभी केली सदानंद देशमुख मोहन पाटील रांजणगाव शंकर सखाराम सुरेंद्र पाटील इत्यादी लेखकांनी नवी दृष्टी प्रदान केली परिवर्तनाच्या या चळवळी निर्माण झाल्या आणि त्या चळवळीतून साहित्याच्या चळवळी उभ्या राहिल्या हा जरी सावता सुभा लोकांना वाटत असला तरी पूर्ण मराठी साहित्याला समृद्ध बनवणारा नवे वाङमयीन प्रवाह आले मराठी साहित्याला समृद्ध बनवलं.

अशा दुःखी कष्टी असलेल्या दारिद्र्यात पिचलेल्या आणि सातत्याने रात्रंदिवस कष्ट उपसून ही आपल्या दारिद्र्य संपता संपत नाही अशा अगदी झालेल्या मानसिकतेला बळ देणारी म्हणून एक चळवळ ही शेतकरी चळवळ आहे या शेतकरी चळवळीनी आपल्या आंदोलनातून चळवळीतून शेतकऱ्याला अशा एका उंचीवर नेण्याचा प्रयत्न केला जागा करण्याचा प्रयत्न केला आपली न्याय हक्क आपल्याला मिळाले पाहिजे आपण उत्पादित केलेल्या मालाला योग्य किंमत मिळाली पाहिजे हमीभाव मिळाला पाहिजे ज्या चळविणे जे प्रश्न उपस्थित केले त्या चळवळीचा खोलवर परिणाम काही कादंबरी करांच्या जीवनावर झालेला होता अस्या काही कादंबऱ्या आहेत. ज्या कादंबऱ्यांमधून प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष परिणाम झाल्याचा आपणाला आढळून येतो अशा शेतकरी आंदोलनाचे किंवा चळवळीचे जे काही प्रभावी पण व्यक्त झालेले आहेत त्यांचे संदर्भ मला असे वाटले की आपणही शोधावे त्या दृष्टिकोनातून त्याचे एक वेगळे संशोधन आपण लोकांच्या पुढे ठेवून असा एक माणूस घेऊन संशोधनाकडे वळलो शेतकऱ्यांच्या जीवनावर खूप कादंबऱ्या लिहिल्या लेखन झाले परंतु हे

सगळं वर्णाच्या पातळीवर असलेल्या चित्र मुलगा आणि चित्र घेऊन पुढे नेण्याचा आणि त्यातून लढायला शिकवणाऱ्या विद्रोह करणाऱ्या आपल्या अन्यायवृद्ध उभे राहणाऱ्या अशा काही नव्या जाणीवांचा निवा या चळवळीतून पुढेआलेआहेतअशानिवडककादंबऱ्यांचाआपण अधिक या संशोधनामध्ये विचार करणारआहोत

२. अभ्यास विषयाची निवड :

ग्रामीण भागात राहत असल्यामुळे शेतकऱ्या विषयी नेहमीच एक प्रकारची नाळ जोडलेली आहे. तसेच पोळा दिवाळी दसरा सणांची पावसाची असणारी शेतकऱ्याची ओढ विविध ऋतूमध्ये ग्रामीण जीवनाची विविध रंग सणवार अशा सुखद अनुभवानंतर प्रखर वास्तवाला भिडणारा शेतकरी अस्मानी सुलतानी संकटना ध्येय आणि समोर जाणारा कष्टकरी तसेच दरवर्षी एक प्रकारचा जुवा खेळणार शेतकरी मातीत टाकून मातीतच मिसळणार बी अंकुरण अशा विविध अवस्थांचा विचार करून शेतकरी आत्महत्या गंभीर प्रश्नाच्या उत्तराच्या शोधात अभ्यास विषयाची निवड

३. अभ्यास विषयाचा हेतू :

प्रत्यक्ष असलेल्या चळवळीचा परिणाम समाज जीवनावर झाला तसा शेतकरी आंदोलनाचा शेतकरी चळवळीचा फार मोठा परिणाम या देशातल्या कृषी परंपरेवर राबवून सुशिक्षित झालेल्या प्रतिभावंतावर पडलेला आहे. त्यांचा अभ्यास करणे त्या लोकांच्या शेतकरी चळवळीच्या प्रेरणेतून त्यांच्या प्रभावातून त्यांच्या आंदोलनाची सामाजिक राजकीय आर्थिक जे संदर्भ आहेत ते शोधण्याचे काम हा मुख्य अभ्यासाचा हेतू आहे.

४. संशोधनाची गृहीतके :

१. मराठी साहित्यात विपुल असे कादंबरी लेखन झाले आहे.
२.मराठीतील अनेक कादंबरकारांनीशेतकऱ्यांचीस्थितीआपल्याकादंबरीतूनमांडलीआहे.
३.महाराष्ट्रामध्येशेतकरीचळवळीलाप्रदीर्घअशी परंपरा आहे.
४. मराठी कादंबरी लेखनामधूनशेतकरीआत्महत्येचा मुद्दा प्रकर्षानेमांडलेलादिसतो.

५. अभ्यास विषयांचे महत्त्व :

- शेतकरी चळवळीतून शेतकऱ्यांच्या दयनीय स्थितीचा आढावा घेणे.
- शेतकरी चळवळीच्या माध्यमातून प्रबोधन घडवणे.
- हमीभावाच्या प्रश्नावर दीर्घकालीन उत्तर शोधणे.
- पावसावर आधारित शेतीला पर्यायी मार्ग शोधणे.
- नैरास्यग्रस्त शेतकऱ्यांना त्यातून बाहेर काढणे.
- पाणी आवश्यक असेल तेवढेच वापरणे. अपव्यय टाळणे.
- सर्व दुःखालाआत्महत्या हे उत्तर नसूनत्याथांबवण्यासाठी प्रयत्न करणे.

६. संशोधनाची मर्यादा व व्याप्ती :

कादंबरीतून येणाऱ्या शेतकरी चळवळीचा विविध अंगाने अभ्यास करताना विविध प्रश्नावर भाष्य करताना शेतकऱ्यांच्या होणाऱ्या आत्महत्या कारण मीमांसा शोधणे. ही संशोधनाची व्याप्ती आहे.विशिष्ट कालखंडातील कादंबऱ्यांचा अभ्यास करणे त्यामधील निवडक कलाकृतीचा अभ्यास करणे तसेच शेतकरी चळवळीतील चळवळीचे वर्णन असणाऱ्या कादंबऱ्यांचा अभ्यास ही या संशोधनाची मर्यादा आहे.

१९६० ते २०२० या कालखंडाचीनिवड ही माझ्यासंशोधनाची मर्यादा आहे.

७. निवडलेली संशोधन पद्धती:

प्रस्तुत संशोधन विषयाच्या अनुषंगाने संशोधन कार्य पूर्ण करण्यासाठी वर्णनात्मक, विश्लेषणात्मक,

समीक्षात्मक अशा संशोधन पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे.

८. **प्रकरणाची रूपरेषा :**

प्रस्तुत संशोधन कार्य पूर्ण करण्यासाठी पुढील प्रमाणे प्रकरणाची रूपरेषा ठरते.

- **प्रकरण पहिले:**

  मराठी कादंबरी वाङमय प्रकार व स्वरूप :

  कादंबरी वाङमय प्रकाराचा अभ्यास करताना कादंबरीची अवस्था काय होती आणि तिचे स्वरूप कशाप्रकारे आहे याचा अभ्यास करणे.

- **प्रकरण दुसरे :**

  ग्रामीण कादंबरी आणि शेतकरी चळवळची वैचारिक पार्श्वभूमी :

  ग्रामीण कादंबरीतून ज्या काही शेतकरी प्रश्नावर प्रकाश टाकणाऱ्या कादंबऱ्यांचा अभ्यास करणे त्यांची वैचारिक पार्श्वभूमी समजून घेणे या प्रकरणात यावर प्रकाश टाकण्यात येईल.

- **प्रकरण तिसरे :**

  शेतकरी चळवळीचे चित्रण असलेल्या कादंबऱ्यांचे स्वरूप :

  वर्णन पर कादंबरीचा जास्त प्रमाणात अभ्यास न करता प्रत्यक्ष चळवळीला वाहीलेल्या कादंबऱ्यावर लक्ष केंद्रित करून त्यांचा अभ्यास करणे.

- **प्रकरण चौथे :**

  शेतकरी चळवळीचे चित्रण असलेल्या कादंबऱ्यांचे वेगळेपण :

  शेतकरी चळवळीचा लढा ज्या कादंबऱ्यातून आला आहे त्यांचा अभ्यासपूर्ण निकष काढून त्यांचे वेगळेपण ठरविणे.

- **प्रकरण पाचवे :**

  शेतकरी चळवळीची चित्रण असलेल्या कादंबऱ्यातील व्यक्तिचित्रण :

  विविध शेतकरी चळवळीचा कादंबऱ्यांच्या माध्यमातून त्या कादंबरीचा नायक शेतकरी चळवळीला न्याय देतो का किंवा माघारी फिरतो यांचा अभ्यास करणे.

- **प्रकरण सहावे :**

  भाषाशैली आणि निवेदन पद्धती :

  स्थळ काळ स्थितीचे भान ठेवून शेतकरी चळवळीचा नायक आपली भाषा न्यायिक दृष्टिकोनातून मांडतो का आणि शेतकरी लढायला न्याय देतो का त्याची भाषा शैली आणि निवेदन पद्धती कशी आहे यांचा अभ्यास करणे.

- **उपसंहार, निष्कर्ष,**

(टिपा मुलाखत)

❖ **टिपा :-** जसजसे अभ्यासाचे क्षेत्र वाढत जाईल तसतशा शेतकरी चळवळीसाठी वाहिलेल्या कादंबऱ्यांचा समावेश करण्यात येईल आणि संशोधन कार्य पूर्ण करेल.

९. संदर्भ ग्रंथांची सूची :

ज्योतिराव फुले,'महात्मा फुले समग्र वाङमय',संपा.य.दि. फडके 'महाराष्ट्र राज्य आणि साहित्य सांस्कृतिक मंडळ, ऑक्टोबर, १९९१.
३. ठाकुर रवींद्र, 'मराठी कादंबरीः समाजशास्त्रीय समीक्षा', दिलीपराज१९९५
३. वाकोडे मधुकर, (प्रतिष्ठान' जानेवारी १९८७
४. जोशी शरद, शेतकरी संघटना-विचार आणि कार्यपध्दती, शेतकरी प्रकाशन, अलिबाग
५. अधिवेशन स्मरणिका, ९३, शेतकरी संघटना पाचवे अधिवेशन
६. परुळकर विजय, योध्दा शेतकरी, राजहैस प्रकाशन पुणे
७. म्हात्रे सुरेशचंद्र, शेतकरी संघटक, पाक्षिक, नांदेड अधिवेशन विशेषांक, १९८९ वर्षतिसरे, अंक
८. सोळुंके श्रीकांत शेतकरी चळवळ, बी. रघुनाथ प्रकाशन, परभणी १९९६
९. आनंद यादव, 'ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि समस्या"पुणे १९७९,
१०. मदन कुलकर्णी, मराठी प्रादेशिक कादबशी: तंत्र आणि स्वरूप', श्रीमंगेश प्रकाशन, नागपूर, १९८४,
११. महात्मा फुले समग्र वाङ्मय -धनंजय कीर/स.गा. मालसे
१२. शेतकरी संघटना विचार आणि कार्यपध्दती- शरद जोशी रिया पाब्लिकेशन२०१३
१३. गावगाडा - त्रि.ना अत्रे.१९७५
१४. शेतकऱ्याचा आसूडः शतकाचा मुजरा - शरद जोशी२०१४
१५. शेतकरी साहित्यः एक नोंद –डॉ. भास्कर चंदनशिव रिया पब्लिकेशन २०१३
१६. ग्रामीण वाइमयाचा इतिहास : चंद्रकुमार नलगे रिया पब्लिकेशन २०१३

संशोधन	मार्गदर्शक
राहुल कुंडलिकराव पडोळे	प्रो.डॉ.मा.मा.जाधव